ISSN (Online) 2582-9327

IJARSCMT

*International Journal of Advanced Research in Science, Commerce, Management and Technology*

Impact Factor: 5.781

Volume 4, Issue 1, January 2023

# भारतातील मासेमारी करणाऱ्या लोकांसाठीच्या शासकीय योजना

**प्रा. डॉ. सिताफुले एल. एस.**

सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

वराडकर – बेलोसे कॉलेज, दापोली, रत्नागिरी

**गोषवारा**

मासेमारी हा व्यवसाय शेती पुरक व्यवसाय असून या व्यवसायाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतामध्ये Marine Fisheries Census in India 2010 च्या रिपोर्टनुसार भारतामध्ये सागरी मासेमारी करणारी लोकसंख्या 40 लाख 25 हजार 735 इतकी असून मासेमारी करणाऱ्या कुटुंबांची संख्या 08 लाखापेक्षाही अधिक आहे. भारताच्या पश्चिम दिशेला अरबी समुद्र, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि दक्षिणेस हिंदी महासागर लाभला आहे. भारतातील एकूण 09 राज्ये आणि 04 केंद्रशासित प्रदेशांना 8118 कि.मी. लांबीचा सागरी किनारा लाभला असून या भागातील बहुतेक लोकांचा व्यवसाय मासेमारी हा आहे. मासेमारी व्यवसाय करणारे लोक अशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. सागरी किनारा लगतच्या भागातील लोक पारंपारिक पध्दतीने मासेमारी करून आपली उपजिविका भागवतात. या मासेमारी व्यवसायाला चालना देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारे यांचेकडून विविध अशा योजना राबविण्यात येतात.

भारतामध्ये मरीन फिशिंग रिपार्ट 2010 नुसार भारतामध्ये सागरी मासेमारी करणारी लोकसंख्या 40 लाख 25 हजार इतकी असून देशातील एकूण मासेमारी व्यवसायापैकी आंध्रप्रदेश राज्यातील मासेमारी व्यवसाय करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण 15. 30%, ओरिसामध्ये 15.19%, पश्चिम बंगालमध्ये 9.50%, कर्नाटक राज्यात 4.20%, महाराष्ट्र राज्यामध्ये 9.69%, गुजरात राज्यात 8.43%, तामिळनाडू राज्यामध्ये 20.14% तर केरळ राज्यामध्ये 15.30% इतके प्रमाण असलेले दिसून येते. मासेमारी करणारा समाज हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. यांच्या उन्नतीसाठी आणि आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये मच्छिमारांना प्रशिक्षण, मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण, मच्छिमार सहकारी संस्थाचा विकास, मासेमारी संकट निवारण निधी अंतर्गत मच्छिमारांना अर्थसहाय्य, बोट खरेदीसाठी अर्थसहाय्य, मच्छिमार बोटींना डिझेल तेलावरील अबकारी करात सूट, मच्छिमारांसाठी राष्ट्रीय कल्याण निधी अंतर्गत घरकूल योजना इत्यादी

**प्रस्तावना :**

आज देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्ष होऊन सुध्दा देशातील काही घटक अजूनही आपल्या हक्क अधिकारापासून वंचित असून ते आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत. म्हणून शासनाने या लोकांचा विचार करून काही विकासात्मक योजनाची निर्मिती केली आहे. या योजनांच्या माध्यमातून जी आर्थिकदृष्ट्या कमकुवत लोक आहेत त्यांचा विकास व्हावा, देशातील आर्थिक विषमतेची दरी कमी व्हावी आणि दुर्बल घटकांचा संरक्षण व्हावे याकरीता शासन कल्याणकारी व्यवसायाभिमुख इ. योजना राबवून अर्थसाह्य पुरवते. भारतातील मासेमारी करणाऱ्या लोकांचा विकास व्हावा व हे लोक इतरांच्या बरोबरीने यावे यासाठी शासन सतत प्रयत्न करीत असते. मासेमारी करणारे लोक आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत तसेच ते इतर सर्व शासकीय लाभापासून वंचित असल्याकारणाने शासनाने मासेमारी करणाऱ्या लोकांचा स्वतंत्र विचार करून काही त्यांच्याकरिता विकासात्मक योजनांची आखणी केली, जेणेकरून त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून येईल. याकरिता केंद्र व राज्य शासन त्यांना लागणारे सर्व भागभांडवल विकासात्मक योजनांच्या माध्यमातून पुरवते. मासेमारी करणारे हे लोक पारंपरिक पद्धतीने आपला व्यवसाय करून उत्पादन घेतात. या सर्व घटकांचा विचार करून शासनाने त्यांच्यासाठी विकासात्मक योजना स्थापन केले आहेत. यामध्ये मासेमारी प्रशिक्षण योजना तसेच पारंपारिक बोटी ऐवजी यांत्रिकीकरण बोटीचा पुरवठा करणे. जेणेकरून त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन वेळेची बचत होईल. त्यादृ ष्टीने शासनाने त्यांना यांत्रिकीकरण बोटी खरेदीसाठी कर्ज पुरवठा करण्यात येतो. शिवाय मासेमारी व्यवसाय जोखिमेचा असल्यामुळे घरातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाला तर त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवू शकते. त्याकरिता शासनाने अपघाती विमा सुरू केला आहे. तसेच मासेमारी करणाऱ्या लोकांसाठी सहकारी पतपेढ्या व मासेमारी सहकारी संस्थांची निर्मिती केली आहे. त्यामुळे या संस्थांमार्फत त्यांना कर्जपुरवठा व योग्य नवीन माहिती दिली जाते. तसेच शासनाने एन.सी.डी.सी या राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळची स्थापना केली आहे. या मंडळामार्फत सर्व प्रकारचे आर्थिक साहाय्य देण्यात येते. शासनाने मासेमारी व्यवसायाला अधिक प्रमाणात चालना व त्यांचा विकास करण्यासाठी वेगवेगळ्या कल्याणकारी योजनांची निर्मिती केलेली आहे त्या योजना खालीलप्रमाणे :

**अववृद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन करणेः**

सदरची योजना ही पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीलाच सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा महत्त्वाचा हेतु असा की, गोड्यापाण्यातील मत्स्य उत्पादन वाढवणे होय. मत्स्य विभागामार्फत जे मासे जलद गतीने वाढतात. त्या माशांच्या बीजांचा पुरवठा स्थानिक संवर्धन करणाऱ्या लोकांना देण्यात येतो. तसेच मत्स्यसंवर्धन योग्य असलेल्या जलक्षेत्रात योग्य पद्धतीने साठवणूक करण्यासाठी दरवर्षी राज्यात 60 कोटी मत्स्यबीजांची आवश्यकता आहे. एवढी मोठी मत्स्यबीजांची गरज भागवण्यासाठी शासनाने 35 मत्स्य बीज केंद्र सुरू करून ते सध्या कार्यरत आहेत.

**मासेमारी बंदराची सुधारणा व मासळी उतरवण्याच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करणे :**

1985–86 ला या योजनेची स्थापना करण्यात आली आहे. सदरील योजनेचा महत्त्वाचा हेतु असा की मासळी नाशवंत असल्यामुळे तिला बोटीतून उतरून घेणे गरजेचे आहे. त्याकरिता शासनाने सागरी किनारी बंदरे बांधणे, बंदरातील खडक फोडणे, बंदरात दिवा बत्तीची सुविधा पुरविणे, मासे उतरविण्याकरिता धक्का बांधणे इत्यादी घटक या योजनेमार्फत राबवण्यात येतात. या योजनेवर केंद्र आणि राज्य यांचा 50 : 50 टक्के खर्चीचा वाटा असतो.

**मच्छीमार नौकांचे यांत्रिकीकरण आणि मच्छीमार नौकांमध्ये सुधारणाः**

मासेमारी व्यवसायाचे उत्पादन वाढावे याकरिता यांत्रिकीकरण नौका असणे गरजेचे असते. त्याकरिता शासनाने 1977–78 या वर्षीपासून सदर योजनेची स्थापना करण्यात आली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय सहकार विकास निगम च्या अर्थसहाय्यातून करण्यात येते. तसेच वैयक्तिक मच्छीमार किंवा गट सहकारी मासेमारी करणाऱ्यांना राष्ट्रीय बँक, सहकारी बँक किंवा शासनाने मान्यता दिलेल्या वित्त संस्था, महामंडळ यांच्यापैकी एकाकडून अर्थपुरवठा करण्यात येतो किंवा विभागामार्फत बोट बांधण्यासाठी अथवा तयार नौका खरेदी केल्यास योजनेमार्फत 25 टक्के अनुदान देण्यात येते. तसेच आउटबोर्ड इंजिन खरेदीकरण्यासाठी मच्छिमारांना 50 टक्के अनुदान म्हणून दिले जाते. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा 25 : 25 टक्के वाटा असतो व उर्वरित रक्कम स्वतः नौकाधारकांना उभारावी लागते.

**मच्छीमारांना प्रशिक्षणः**

सदरील योजनेमार्फत भूजल विभागातील मासेमारी करण्यासाठी आवश्यक ज्ञान असणे गरजेचे असते. याकरिता मत्स्यबीज उत्पादन केंद्रातून महिनाभराचे लघू प्रशिक्षण देण्यात येते. शासनामार्फत प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तीला दोनशे रुपये याप्रमाणे विद्यावेतन व प्रवास खर्च दिला जातो. तसेच इंजिनाची निगा कशी राखावी आणि मत्स्य उत्पादनात कशी वाढ करावी याकरिता मच्छिमार तरुणांना प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये वसई, अलिबाग, रत्नागिरी, मालवण इत्यादी ठिकाणी सहा महिन्यात एकदा म्हणजे वर्षभरातून दोन वेळेस प्रशिक्षण दिले जाते.

**बिगर यांत्रिक नौकांना बाह्य व आंतर इंजिन बसविण्यासाठी अर्थसहायः**

वंश परंपरागत मासेमारी करणारा हा समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. यांत्रिक नौका खरेदी करण्याइतके भांडवल या मच्छिमारांकडे नसते. त्यामुळे त्यांनी पारंपरिक बोटीने सागरी मासेमारी करतात. तेव्हा अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल मच्छिमारांच्या पारंपरिक बोटींना बाह्य आणि आंतर इंजिन बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून अर्थसहाय केले जाते. पारंपरिक होडींना एक सिलेंडर क्षमतेचे इंजिन बसविण्यात येते. या एक सिलेंडर क्षमतेच्या यांत्रिक बोटीने पाच वावापर्यंत मासेमारी केली जाते. बिगर यांत्रिक नौकांना बाह्य आणि आंतर इंजिन बसविल्यामुळे वेळ आणि श्रम वाचतो आणि मत्स्य व्यवसायाला चालना मिळते. तसेच मच्छिमारांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

**मच्छीमार साधनांच्या खरेदीवरील अर्थसाहाय्यः**

या योजनेचा महत्त्वाचा उद्देश असा की आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले मच्छिमार व अनुसूचित जमातीतील मासेमारी करणारे लाभार्थी यांना आधुनिक पद्धतीने मासेमारी व्यवसाय करण्यासाठी अर्थसाहाय्य करणे. जसे की नायलॉन, जाळी, डिझेल, बिगर यांत्रिकी नौका इत्यादी खरेदी करण्यासाठी शासनामार्फत 50 टक्के अनुदान आर्थिक स्वरूपात देण्यात येते. तसेच योजनेच्या पात्र मासेमारी लाभार्थ्याला वार्षीक 15 किलो नायलॉन सूत देण्यात यावे अशी अट आहे. सागरी मासेमारी करण्यासाठी विविध

साधनांचा वापर केला जातो. सागरातील विविध प्रकारचे मासे पकडण्यासाठी मगरनेट, गिलनेट, तीनबोटी, डोळ, रापण, बोक्सी, हुकलाईन, तरती इत्यादी वेगवेगळ्या जाळ्यांचा वापर करून मासेमारी केली जाते. मासेमारीचे जाळे खरेदीसाठी सरकारकडून अर्थसहाय केले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभधारक मच्छिमार सहकारी सोसायटीचा सभासद असावा लागतो. बिगर यांत्रिक नौका खरेदीसाठीसुद्धा सरकारकडून अर्थसहाय केले जाते. या योजनेचा लाभ घेणारा मच्छिमार यापूर्वी या योजनेचा लाभ न घेतलेला असावा लागतो.

### डिझेल तेलावरील अबकारी करातील सूटः

सदरची योजना 1990–91 या वर्षी स्थापन करण्यात आली. योजनेचा महत्त्वाचा उद्देश असा की वीस मीटर पेक्षा कमी लांबीच्या यांत्रिकीकरण असलेल्या मच्छिमारी नौकांना लागत असलेल्या हायस्पीड डिझेल तेलावर केंद्रीय उत्पादन शुल्कातून सुट देण्यात आली आहे. योजनेच्या सुरुवातीला केंद्र शासनाकडून अर्थसाहाय्यासाठी 100 टक्के खर्चावर अनुदान देण्यात आले. परंतु शासनाने 1991–92 या वर्षापासून फक्त अर्थसहाय्य देण्याच्या पद्धतीत बदल केला आहे. यामध्ये 80 टक्के अर्थसाहाय्य उपलब्ध करण्यात येते. एक सिलेंडर ते सहा सिलेंडरच्या यांत्रिक बोटींना डिझेलवर 100 टक्के विक्रीकरात सवलत देण्याची योजना वित्त विभागामार्फत राबविण्यात येते. त्यानुसार बोटीच्या इंजिनाच्या क्षमतेनुसार त्या बोटीसाठी लागणारे डिझेल निश्चित करून मच्छिमार सहकारी संस्थेसाठी डिझेल कोटा निर्धारित करण्याची पद्धत सुरु करण्यात आली. यांत्रिक बोटीसाठी लागणारे डिझेल मच्छिमारांनी खरेदी केल्यानंतर त्यांना शासनाकडून डिझेलच्या परतावा (Returns) देण्यात येतो.

### निमखाऱ्या पाण्याच्या क्षेत्राचे सर्वेक्षणः

योजनेचा महत्त्वाचा उद्देश असा की निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी या मत्स्य उत्पादनाचे कमी प्रमाणात उत्पादन आहे. हे उत्पादन पारंपारिक पद्धतीने मासेमारी केल्यामुळे कमी निघते. या क्षेत्राचा विचार केला असता शासनाने निमखाऱ्या मत्स्यशेतीसाठी कसा वापर करता येईल. त्याकरिता सर्वेक्षण करून यामध्ये उत्पादन कसे घेता येईल यासाठी शासनाने 70 लहान–मोठ्या खाड्यांचे पाहणी करून उत्पादन घेण्याचे ठरविले आहे. सदरील योजनेच्या माध्यमातून जवळपास दहा हजार हेक्टर क्षेत्र मत्स्य संवर्धन आणि उत्पादनासाठी याचा फायदा होईल असा प्राथमिक अंदाज योजनेचा आहे.

### निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणाः

कोळंबीचे उत्पादन वाढीसाठी तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून व अत्यावश्यक साधनाचा वापर करण्याच्या उद्देशाने ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात सदर योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. योजनेमार्फत व्यवसाय करणाऱ्यांना जागेची निवड कशी करावी, पीक कसे काढावे व विक्री कशी करण्यात यावी या सर्व बाबी लक्षात घेऊन तांत्रिकदृष्ट्या साहाय्य करण्यात येते. मच्छ कास्तकारांना निमखाऱ्या पाण्यातील मत्स्य संवर्धनासाठी तळी विकसित करण्याच्या हेतूने बँकेकडून कर्ज मिळवून देणे. केंद्र व राज्य शासनाकडून मिळणारे 50 : 50 टक्के अनुदान मिळवून देणे इत्यादी कामे योजनेमार्फत करण्यात येतात. ही योजना केंद्र शासनामार्फत राबविण्यात येत असून भांडवली खर्च व प्राथमिक पीक घेण्याकरिता हेक्टरी येणाऱ्या खर्चासाठी 25 टक्के आणि जास्तीत जास्त 30 हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. तसेच अनुदानाचा येणारा खर्च निम्मा निम्मा केंद्र आणि राज्य शासनाने करावा आणि उर्वरित खर्च म्हणजे 75 टक्के खर्च स्वतः लाभार्थ्यांनी करावयाचा आहे ही अट सदरील योजनेची आहे.

### मासळीचे सुरक्षण परिवहन व पणनः

मासळी ही नाशवंत वस्तू आहे. मासळी खराब होऊ नये म्हणून बर्फाची, शीतगृहाची आवश्यकता असते. तसेच माशांची वाहतूक करण्यासाठी टेम्पो, ट्रकची आवश्यकता असते. सागरी मच्छिमारांना मासळीचे सुरक्षण परिवहन आणि पणन या योजनेअंतर्गत बर्फ कारखाना आणि शीतगृहाची उभारणी करण्यासाठी 55 टक्के कर्ज, 05 टक्के भागभांडवल, 30 टक्के खास विमोचक भागभांडवल असे एकूण 90 टक्के रक्कम योजनेअंतर्गत मच्छिमारांना दिले जाते. फक्त 10 टक्के रक्कम लाभार्थी मच्छिमारांना उभारावयाची आहे. या योजनेअंतर्गत लाभ मच्छिमारांना मिळत असल्यामुळे बर्फाचा कारखाना आणि काही ठिकाणी शीतगृहाची उभारणी केल्यामुळे मासळी टिकून राहण्यास मदत झाली.

**निमखाऱ्या पाण्यातील मच्छीमारांचा विकासः**

केंद्र शासनाच्या एकात्मिक निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास या कार्यक्रमा अंतर्गत राज्यातील निमखारे पाणी क्षेत्राचे सूक्ष्मतम सर्वेक्षण करण्यात येते. तसेच तांत्रिक व अभियांत्रिकी कर्मचारी वर्गाचे एका पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासन 50 टक्के रक्कम अर्थसाहय म्हणून देणार आहे . पाणी परिक्षण करून खाडीच्या पाण्याची भरती ओहटीची उंची पाण्याची आम्लता, क्षारता, व प्राणवायू इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे यामुळे कोळंबी संवर्धन करण्याकरिता योजनेचा लाभ होणार आहे.

**मासेमारी नौकावर संदेशवहन, मासळीचा शोध घेणे इत्यादी अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्यः**

मासेमारी नौकावर संदेशवहन, मासळीचा शोध घेणे इत्यादी अत्याधुनिक यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी अर्थसहाय देण्याची योजना 1999 पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. यांत्रिक नौकाने सागरी मासेमारी करीत असताना मच्छिमार खोल समुद्रात दूरवर जाऊन मासेमारी करतात. काही मच्छिमारांची एक फेरी सात ते आठ दिवसाची असते. तेव्हा अचानक हवामानात बदल, चक्रीवादळ इत्यादीची माहिती मच्छिमारांना देण्यासाठी वॉकीटॉकी या साधनांची गरज असते. तसेच मासेमारी करताना माशांचे थवे आणि माशांचा साठा शोधण्यासाठी जीपीएस आणि एकोसाऊंडर या साधनांची गरज असते. तेव्हा हे साधने खरेदी करण्यासाठी सरकारकडून अर्थसहाय्य केले जाते. एकोसाऊंडर यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या 25 टक्के परंतु 15000 च्या मर्यादेत अर्थसहाय केले जाते. जीपीएस (नेव्हीगेटर) यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या 25 टक्के परंतु 75000 रुपयाच्या मर्यादेत आणि वॉकीटॉकी यंत्रसामुग्रीच्या किंमतीच्या 25 टक्के परंतु 12500 रु. च्या मर्यादेत सरकारकडून यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी मच्छिमारांना अर्थसहाय केले जाते.

**मच्छिमार सहकारी संस्थांचा विकासः**

सागरी मासेमारी करणारे लोक आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेले आहेत. मासेमारी व्यवसाय करणाऱ्या लोकांना मत्स्य व्यवसायासंदर्भातील योजनांची माहिती देण्याचे आणि तांत्रिक ज्ञान देण्याचे कार्य मच्छिमारी सोसायट्या करीत असतात. परंतु या मच्छिमार सहकारी सोसायट्या आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी आणि व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी सरकारकडून अर्थसहाय्य केले जाते. गट पुरस्कृत प्राथमिक मासेमारी सहकारी संस्थांना 5000 रु. दिले जातात. तर गटाद्वारे किंवा समूह पुरस्कृ त नसलेल्या प्राथमिक संस्थांना 8000 रु. दिले जातात. जिल्हा संघ व विभागीय संघाला व्यवस्थापकीय अनुदान 1 लाख 25 हजार रु. सरकारकडून दिले जातात.

**राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड हैदराबाद यांचे मार्फत कौशल्य विकास कार्यक्रमः**

मत्स्य व्यवसायाची परिपूर्ण माहिती आणि तांत्रिक ज्ञान मच्छिमारांना देण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड यांचेकडून कौशल्य विकास कार्यक्रम विविध जिल्ह्यामध्ये राबविण्यात येते. या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मच्छिमारांना तीन ते पाच दिवसाचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. निमखाऱ्या पाण्यात मासेमारी करणारे, सागरी मासेमारी करणारे आणि गोड्या पाण्यात मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांना प्रशिक्षण देण्यात येते. मच्छिमारांना प्रशिक्षण देण्यासाठी सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड यांचे मार्फत प्राप्त निधी संबंधित जिल्हा कार्यालयांना वितरीत करण्यात येते. सन 2017–18 मध्ये 15 लाख 57 हजार एवढा निधी खर्च करण्यात आला असून 800 प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षण देण्यात आले.

**मासेमारी संकट निवारण निधी अंतर्गत मच्छिमारांना अर्थसहाय्यः**

मासेमारी व्यवसाय अत्यंत जोखमीचा आहे. यासाठी जर व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला अपघात झाला आणि त्यामुळे तो मृत्युमुखी पडला तर वारसदाराला आर्थिक सहाय्य देण्याच्या उद्देशाने मच्छीमार आपत सहाय्य निधी स्थापन करण्यात आलेला आहे. . या व्यतिरिक्त मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्याचे संरक्षण करिता अपघात गट विमा योजना आहे. या विम्याच्या हप्त्यावर केंद्र व राज्य शासनामार्फत अनुदान देण्यात येते. इत्यादी वरील प्रमाणे योजनांच्या माध्यमातून मासेमारी करणाऱ्या कुटुंबांना अर्थसाह्य देण्यात येते. मासेमारी व्यवसायात धोका आणि अनिश्चितता अधिक असते. मासेमारी करताना अपघाती मृत्यू झाल्यास मयतांच्या वारसदाराला सरकारकडून अर्थसहाय केले जाते. परंतु काही अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे. तो मच्छिमार सहकारी सोसायटीचा सदस्य असावा लागतो. मच्छिमार मासेमारी करताना अपघाती निधन झाल्याची नोंद पोलीस स्टेशनमध्ये केलेली आणि

पोलीसाचा पंचनामा असावा लागतो. मृत मच्छिमारांचे ग्रामपंचायतीने दिलेले वारस प्रमाणपत्र तसेच सदर मृत व्यक्तीचे नाव जन्ममृत्यू नोंद रजिस्टरमध्ये असावे लागते. इत्यादी बाबींची पूर्वता केल्यानंतर मयत झालेल्या व्यक्तीच्या वारसांना साठ दिवसाच्या आत रक्कम मिळण्याची व्यवस्था केली जाते.

**मच्छिमारांसाठी राष्ट्रीय कल्याण निधी अंतर्गत घरकुल योजनाः**

सागरी मासेमारी करणाऱ्या आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या मच्छिमारांना राष्ट्रीय कल्याण निधी अंतर्गत घरकुल योजना राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तो मच्छिमार भूमिहीन, अल्पभूधारक किंवा दारिद्र्य रेषेखालील असावा लागतो. या योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल 10 व्यक्तींचा गट तयार करून त्यांना घरकुल योजनेचा लाभ दिला जातो. गरीब मच्छिमारांना या घरकुल योजनेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित मच्छिमार दारिद्र्य रेषेखाली किंवा भूमिहीन असल्याबाबतच ग्रामीण विकास यंत्रणा किंवा तहसिलदार यांचा दाखला देणे आवश्यक आहे. अशा पात्र मच्छिमारांना या योजनेअंतर्गत घरकुल आणि कुपनलिका या बाबींसाठी सरकारकडून अर्थसहाय्य केले जाते. या योजनेमुळे गरीब मच्छिमारांचे राहणीमान सुधारण्यास मदत होते.

**संदर्भ सूचीः**

**[1].** नागरिकांची सनद, आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
**[2].** मत्स्य व्यवसाय कार्यक्रम अंदाजपत्रक (2018), शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर, महाराष्ट्र शासन
**[3].** मत्स्य व्यवसाय योजनेंतर्गत योजनेचे मूल्यमापन (1996), आदिवाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई
**[4].** www.maharashtra.gov.in
**[5].** मत्स्य व्यवसाय योजनेंतर्गत योजनेचे मूल्यमापन पूर्वोक्त